डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

रासेयो/२०२२–२३/७५४ दि. ०६/०९/२०२२

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयोसंलग्नित महाविद्यालये,**
**फक्त पुणे शहर व पुणेग्रामीण**
**सावित्रीबाई फुलेपुणे विद्यापीठ**

**विषय :'तृतीयपंथीयांचा लोकशाहीतील सहभाग' या विषयावर मिम्स व भित्तीचित्रे तयार करणेबाबत**

**माननीय महोदय,**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृती अंतर्गत विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या अंतर्गत पुणे शहर व पुणे ग्रामीण विभागातील रासेयो स्वयंसेवकांमार्फत **'तृतीयपंथीयांचा लोकशाहीतील सहभाग' या विषयावर** मिम्स व भित्तीचित्र (पोस्टर) तयार करण्यात येणार आहे. **यामध्ये सहभागी होताना स्वयंसेवकांनी २ फूट बाय ३ फूट आकाराचे भित्तीचित्र (पोस्टर) व मिम्स तयार करावे, तयार केलेल्या भित्तीचित्र/मिम्सची पीडीएफ** https://forms.gle/hQyWZT1YGNgaqkeL8 **या गुगललिंकवर दिनांक १२ सप्टेंबर २०२२ पूर्वी अपलोड करावी व दिनांक १२ सप्टेंबर २०२२ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत निवडक २ भित्तीचित्र (पोस्टर) व मिम्स रासेयो कार्यालयात जमा करावी.**

या निवडक **भित्तीचित्र (पोस्टर) चे** प्रदर्शन दिनांक १४ व १५ सप्टेंबर २०२२ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारामध्ये आयोजित करण्यात आलेल्या **'तृतीयपंथीयांचा लोकशाहीतील सहभाग'** या दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेमध्ये करण्यात येणार आहे. तसेच निवडक मिम्सना विद्यापीठाच्या सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रसिद्धी देण्यात येणार आहे.

तसेच पुणे शहरातील महाविद्यालयांनी या पोस्टरद्वारे दिनांक १४ व १५ सप्टेंबर २०२२ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारामध्ये आयोजित करण्यात आलेल्या **'तृतीयपंथीयांचा लोकशाहीतील सहभाग'** या दोन दिवसीय राज्यस्तरीय परिषदेचा प्रचार व प्रसार शहरातील मुख्य चौक व महाविद्यालयांमध्ये करावा.

कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**